
# शब्द-शक्ती




# शब्द-शक्ती

*पंचवीस-तीस पेंशट, अडीच तीन तास, डॉक्टरचा कंटाळलेला जीव, घरी निघावं, अनु वाट पहात असेल. डॉक्टर माधवला हांक मारतो, माधव येतो आंत दरवाजा लोटून.*

*"कुणी पेंशट आहे कारे ?"*

*"नाही साहेब !"*

*"हे बघ तू बंद करून जा !" डॉक्टर आपली आवराआवर करू लागतो बाहेर पेंशटची चाहूल.*

*"साहेब पेंशट आहे !" माधव म्हणतो.*

*नाराज झालेला डॉक्टर,*

*"बरं पाठव आंत." माधव बाहेर, दार लोटून एक वृद्धसे गृहस्थ आंत येतात.*

"ये बेटा, आंत ये !" तिचा हात धरून ते तिलाही आंत घेतात. ती असेल वीस वर्षाची, गोल चेहरा, गोरी त्वचा, नाजूकशी, गोड वाटणारी. डोळे छान, काहीशे तपकीरी, कशालातरी घाबरणारे. ती खूप निस्तेज, पण कधीकाळी तेजस्वी असावी. डॉक्टर चेह-यावर नेहमीचं हसू पांघरतो.

" बसा...... बैस" ती बसते खाली मान घालून. ते गृहस्थ कागदाच एक मोठ पुडकं डॉक्टर समोर ठेवतात. डॉक्टर ते पहातो. गृहस्थ बोलत असतात.

"जो त्रास होतो तो नेहमी तोच नसतो, दरवेळी वेगवेगळा, आधी दोन मानसोपचार तज्ञ डॉक्टरांना दाखवलं, निरनिराळी रोगांची नांव सांगतात. औषध मात्र बरीचशी तिचतिच असतात. फरक काहीच नसतो."

"हं... ... चल !" डॉक्टरच्या शब्दाचा अभिप्रेत अर्थ घेवून ती पेंशट टेबल कडे जाते, झोपते. डॉक्टर तिला तपासत गोड आवाजात,

"बोल... काय होतय तूला ?" ती अबोल.

"अगं, तू बोलणार नाहीस तर मला कळणार कसं ? आणि मला कळणार नाही मग तू बरी कशी होणार ? "

"मला नाही आठवतं !" तिचा आवाज तिच्या चेह-या इतकाच आकर्षक पण बोलण्याची इच्छा नसलेला.

"केव्हा आठवेल ?"

"नेहमी नाही आठवत, आठवत कधी कधी आणि मग त्रास व्हायला लागतो, त्यापेक्षा नकोच आठवायला !"

"हं काय त्रास होतो ?"

"सांगीतल नां, आठवत नाही म्हणून-"

"तूला बरं व्हायचय ना ? पुन्हा हसायचय ना ?" डॉक्टरचे गोड हसरे टिकाऊ शब्द. ती पहात असते समोरच्या फ्लॉवर पॉट मधील फुलाकडे एकटक. ती फुलं तिच्या डोळयातून खोल अंतरंगात उतरल्या सारखी.

" डॉक्टर या फुलानां सुगंध मिळेल का हो ?" ती बोलून जाते फुलाचं दुःख स्वतःच्या दुःखासारखं.

"मिळेल ना, त्यावर थोडा परफ्युम स्प्रे केला की मिळेल त्यातून सुगंध !" डॉक्टर स्वतःच दिलखुलास हसतो. ती मात्र शुन्य असते आणि बोलत जाते शुन्यातल्या विश्वात हरवल्यासारखी.

"मला जगायचय ! कारण मला मरण्याची तीव्र इच्छा होत नाहीये. मला झोपायचं सुद्धा नाही, झोपणं म्हणजे तेवढया वेळेपुरत मरणच असतं ते ! तुमची औषध झोपवतात मला... ... ... तुम्ही मला बरं करणार ?" डॉक्टर प्रश्नचिन्हात बांधल्या सारखा हो म्हणतो.

"मला जो त्रास होतो तो मी लिहून ठेवलाय तुम्ही वाचा !"

"हे बघ, पाच मिनिटात मी तुला तपासेन, तूला आठवेल तस सांग, मी औषधं लिहून देईन- "... ... ... डॉक्टरला घाई झालेली, ती गप्प, नर्व्हस डॉक्टर गोंधळत जातो. गृहस्थ बोलू लागतात.

" खरचं, तुम्ही वाचून पहा ते. ते वाचून दोन डॉक्टरांनी ही केस घेतलीच नाही. तुम्हाला कदाचित ते चॅलेंज स्विकारता येईल. मी आणलीय ती वही, पुन्हा आठ एक दिवसानीं तिला घेउन येईन.

डॉक्टर खुर्चीत, डोक्यातला कंटाळा चेह-यावर दाखवता येत नाही त्याला. गृहस्थ ती वही समोर ठेवतो. नाईलाज झाल्यासारखा डॉक्टर ती घेतो. गृहस्थ फी चे पैसे पुढे करतात, तसा डॉक्टरच्या डोक्यातला कंटाळा बराचसा पसरट हसतो. गृहस्थ व ती दोधं जातात. डॉक्टरही ताडकन घरी पाहोचतो. डॉक्टरची बायको अनु छान

स्वंयपाक करते. दोघाचं जेवण होत आणि मग वेळ होते जवळजवळ झोपण्याची, अनु दिवाळी अंकातल्या कथेत रंगलेली, डॉक्टर फेकायला सांगतो तो अंक. ती नाही ऐकत. सहज डॉक्टरला आठवत सांयकाळच्या पेशंटची वही. डॉक्टर वही काढतो. पहील पान-

“ मी लिहीतेय, मला आठवेल तसं,
मला बर वाटत नाही, अस सगळे म्हणतात,
मला काय होतय ते मात्र कळत नाही,
पण मला असं वाटत मला काहीतरी भास होत असतात,
ते भास होत असतात तेव्हा अतिशय खरे वाटतात,
मी बसलेली असते माझ्याच शेजारी,
मला वाटत कविता करावी छानशी,
मी सुदंरश्या फुलानां डोळयासमोर आणण्याचा प्रयत्न करते,
माझ्याभोवताली मोहरून येतो गुलाबांचा बगीचा, सुगंधी गुलाब, लाल, पिवळा, पांढरा गुलाब, आणि मिश्र रंगाचेही गुलाब, कितीतरी रंग असतात त्याचे,
किती सुगंध दाटतो खोलीत, त्या सुगंधाचा अभिमान वाटतो मला,
माझी मान स्वाभिमानान ताठ होते, गर्वानं वर जाते ... ... ... ... ... तेव्हा मला दिसतो छताला लोबंकळणारा विजेचा बल्ब !
किती तापलाय तो, मी एक सारखी पाहतेय त्याला,
बल्ब च्या आत पेटलेली तार,
ती तार जाड होउ लागते आणि लांब सुद्धा,
ती तार हलतेय, वळवळतेय एखादया पेटलेल्या नागिणी सारखी,
ते तीव्र किरण सहन होत नाहीत माझ्या डोळयानां,
डबडबलेत डोळे माझे,
ती नागिण ओकते आहे लोखंडाच्या रसा सारखी आग,
माझ्या भोवतालचे सगळे गुलाब जळताहेत !... .. मी वाचवू पहातेय त्यानां,
पण सगळया सुगंधाचा धूर धूर झालाय,
माझ्या नाकातोंडात शिरतोय तो धूर !
मला ओरडायचंय !
मला ओरडायलाच हवयं !
ओरडण्याशिवाय काही पर्यायच नाहीये- पण..पण माझा आवाज कुठे गेलाय ?
कुठं गेलाय माझा आवाज ?
डबडबत्या डोळयांनी दिसत मला,
त्या पेटलेल्या नागिणीच्या गळयात जाउन बसलाय माझा आवाज, आणि मी अबोल, मुकी, माझे गुलाब जळताहेत तरी ?
मी फुफ्फुसात खुप हवा भरून घेण्याचा प्रयत्न करते, पण हवा नाहीच कुठे ?
धूर आहे सगळीकडे पाकळयाचा !
माझ्या शरीराला कंप, नागिण हसतेय,
किती घाम निघतोय माझ्या अंगांगातून, चिंब भिजलेय मी,
घाम वाहतोय एकसारखा, विझवून टाकतो गुलाबांचा कोळसा,...
माझ्या शरीराचा धाम घाम होतोय,
मी कोसळून पडते ... खाली ... कोळश्याच्या चिखलात !
खोल खोल रूतुन पडते मी त्यात !” डॉक्टर हसू लागतो,
“काय हो काय झाल ? ... का हसताय ?” अनु विचारते.
“ अगं तुझ्या वाचण्यासारख आहे, मला तर तुझ्या कथासारख वाटत बघ.”

“ काय आहे ते ?”

“ व्यथा आहे माझ्या पेशंटची ” डॉक्टर सायंकाळची गंमत सागंतो.

“ आश्चर्यच आहे ! ”

“ नाहीतर काय ! ”

“आश्चर्य तिच नाही तुमच, पेशंट त्याची व्यथा सागंतोय, थोडयाथोडक्या नाही तर चागंल्या वही भरून आणि तुम्ही हसताय ? ”

“ तू वाचून पहा, तू ही हसशील ! ”

“ नाही हो, तुमच्या पेशंटच मला तोंडही पहायला आवडत नाही आणि इतक्या कंप्लेन्ट असतील तर सोडून द्या तो पेशंट ! ”

“ अगं वाच तर ... ... पण जरा मोठयानं,” अनु वाचू लागते.

“ आणि शुद्धीवर येते तेव्हा काहीच आठवत नाही,
सगळे विचारतात मला, विचारून विचारून थकतात,
मी आठवून आठवून थकते,
पडलेली असते, टेबलावर मान टाकून,
समोर कोरे कागद असतात, पण एक शब्द लिहावासा वाटत नाही, आणि जाणवू लागत दोन दिवसापूर्वी मी कोळश्याच्या चिखलात फसले होते.
पेटलेल्या नागिणीनं, ओकलेल्या आगीत जळालेल्या गुलाबांचा कोळसा,
माझ्या घामानं भिजून झालेला चिखल,
सुकुन गेला तो चिखल, उडून गेला धुळ होऊन,
मी मात्र काळीकुटट् झालेय,
माझ्या भोवताली चार भिंतीं असतात,
त्या भिंतीं एकदम सोन्याच्या होतात, लकाकतात,
मी मात्र कोळश्याची, कुटट् काळी,
डोक्यावरच छत मोठया हि-यासारख चमकायला लागत. तो प्रचंड हिरा वर वर जातोय, आभाळात, चारही भिंतीं माझ्यापासून दूर दूर पळताहेत आणि माझ्याभोवती उरत एक अजस्त्र जंगल ! नाही मला भिंती हव्याहेत, मला घर हवयं !
मला माझं घरं हवयं, मला धावायच असत भिंतीनां पकडण्यासाठी,
पण एकाच वेळी चारही दिशानां नाही पळता येत मला,
आणि वर उडताही येत नाही,
मी लुळी होउन वळवळते अजगरासारखी, कुणीतरी धरतय, मला दाबून ठेवतय,”

डॉक्टर झोपला. अनु वाचत असते. शब्द काहीतरी नातं जुळवत असतात एका अंतरंगाची दुस-या अंतरंगाशी ओळख होत असल्यासारखे.

“सगळे म्हणतात, मला काहीतरी होत, पण मला वाटत मला काहीच होत नाही,
माझ्या भोवतालच्या वस्तुनांच काहीतरी होत,
माझ्या खोलीतल्या वस्तु एकदम माझ्याविरूद्ध उभ्या ठाकतात, जोरजोरात अंगावर येतात, मी जिवाच्या आकांतान ओरडते,
ओरडू नको तर काय करू मी ?
सगळे शत्रू झालेत माझे ! कुणीच नाही माझं ?
मग वाटत आई बाबा माझे आहेत.
मग का नाही थोपवून धरत ते माझ्या शत्रूनां ?
ते दोघही माझ्या शत्रूनां सामिल झाले असावेत ?

पण नाही.. ... बाबा तसे नाहीत, माझ्या कवितेला बक्षिस मिळाल तेव्हा कीती आनंदले होते बाबा, इतका आनंद तर त्यालाही झाला नव्हता. आई कीती काळजी करते माझ्या लग्नाची.

आणि मी ही अशी ! कोण करील माझ्याशी लग्न ?

तो तर निघून गेला तिच्या सोबत, ती श्रीमंत आहे खूप, मी गरीब, आई रडते ब-याचदा, बाबाही रडत असावेत, पण रडतानां दिसत नाहीत कधीच,

मला बरं वाटाव म्हणून ते मांत्रिक आणतात,

काळाडोंब ! कोळश्याच्या चिखलातून निघाल्यासारखा,

तो धूर करतो खोलीभर,

काहीतरी बडबडतो वेड्यासारखा,

मला विचारतो रागावून, बोल ! बोल कोण आहेस तू ?

मी स्वतःलाच विचारते, कोण आहे मी ? कवियत्री ... प्रेयसी ... गुलाबाचं फुल ... की वेडी ?

उत्तरं खूप असतात, म्हणून मी गप्प !

तो खडसावून विचारतो काय हवयं तूला ?

मी म्हणते सुगंध ! मी असं का म्हणते नाही उमगत,

कसला ? तो विचारतो,

मी म्हणते फुलाचां ... किंवा कवितांचा, नाही शब्दांचा. तो पाणी मारतो सपासप माझ्या चेह-यावर. बर्फाच्या खड्यासारखे ते थेंब थंडगार चटके देतात कातडीला, धूरावर घट्ट पकडून ठेवतो तो माझ तोंड, कीती कीती छळतो मला अगदी त्याच्याच सारखा.

मी रडते केविलवाणी

तो मांत्रिक जातो केव्हातरी, ... .... पण तो मांत्रिक मला पुन्हा दिसू लागतो, टेबलाच्या खाली, अगदी कोप-यात, तो अलगद बाहेर येतो, मोठा होतो. त्याचा रंग गोरागोरा होतो. तो सुदंर दिसू लागतो. कुरळया केसांचा, तरूण, अगदी त्याच्याच सारखा.

नाही तोच !

तो मुठी भरभरून पैसे उधळतो माझ्या अंगावर, तो म्हणतो तुझ्या कवितेल्या फुलानां सुदंरसा सुगंध असतो, ही घे त्या सुगंधाची किमंत !

माझ्या हृदयातले शब्द आटून जातात,

कोरड शुष्क होऊन जात हृदय माझं,

शब्द नाहीतच तर मग सुगंध कसा येणार ?

... नको रे नको असे पैसे फेकू, मी विनवते त्याला, तो ऐकत नाही, त्यांची श्रीमंती त्याला ऐकूच देत नाही. तो गुलाम झालाय तिचा !

मग फक्त आसवाचां पूर ,

तो त्या श्रीमंती सोबत दूरदेशी निघून गेलेला.

आता येणार नाही तो !

तो नाही मग शब्द कसे येतील ?

शब्दच नाही मग कविता होईल कशी ?

कवितानां सुगंध कसा येईल ?

तो म्हणायचा तुझ्या कवितात सुगंध आहे, भास होता तो !

पण तो म्हणायचा तेव्हा केव्हढं सत्य होत ते !

नाही आजही तेच सत्य आहे !

मला कविता करायचीय, त्या कवितेचा सुगंध दरवळेल,

त्या सुगंधाचा मागोवा घेत घेत तो येईल, त्याची श्रीमंती तिथेच सोडून.

माझ्या कवितेत आहे सार्मथ्य !

पण ... पण शब्दांच काय, ते तर अर्थहीन झालेत, हसताहेत नुसते, मला हिणवताहेत ... माझेच शब्द, माझ्या बक्षिस मिळवलेल्या कवितेतून बाहेर पडलेत ते डायव्होर्स दिल्यासारखे,

काय कराव मी ?

मला काहीतरी केल पाहीजे ?

निदान माझ्या कवितानां तरी वाचवलं पाहीजे !

त्यातली फुलं जळायला नकोत,

माझ्या आंतमध्ये एक युद्ध होत घनघोर, माझ्याच शब्दाशी, ते शब्द रक्तबंबाळ करतात मला, मी मरून पडते,

माझी अंतयात्रा नेतात शब्द, आणि जाळतात मला, .... ... ... आणि मग श्रद्धांजली !

माझ्याच कवितेच्या दोन ओळी शिंपडतात माझ्यावर !

माझ्या अंतयात्रेलाही येत नाही तो,

माझा आत्मा थांबलाय भुताटकी सारखा,

त्याची वाट पहात !

लिहीतानां अडखळते मी, माझ्या लक्षात येत माझा हात लिहीतोय, म्हणजे मी जिवंत आहे, जिवंतपणाची ही जाणिव जास्त भयावह असते.''

अनु वाचत जाते सगळं याहीपेक्षा खूप असचं, बरचसं ... शेवटची ओळ असते

''मी जे लिहीलय ते सत्य आहे असं लिहीतानां मला वाटत पण नतंर वाटत, मला जे वाटत त्यातल यात काहीच नाही !''

अनु विचार करते खूप, काहीतरी ठरवते दुपारी जेवणानतंर लोळत असतो डॉक्टर, वेळ पाहून अनु विचारते.

''काय करणार त्या पेशंटच ? ''

'' कोण पेशंट ?''

'' तो वही भरून कंम्प्लेटं करणारा ! ''

'' त्याच काय दोन दिवस शांत झोपली की बरं वाटेल तिला ! ''

'' त्या पेशंटची ट्रीटमेंट मी केली तर ?'' अनुचा आत्मविश्वास बोलतो.

'' व्हॉट नॉनसेन्स तू काय करणार ?'' डॉक्टर हिनवतो अनूला

'' तुमच्या प्रिस्क्रिपशन वर एक कविता लिहून देणार आहे मी तिला !''

'' तूला काय वाटत, औषधापेक्षा तूझ्या शब्दात जास्त पॉवर आहे ? ''

'' शब्दाची शक्ती जगातला ग्रेट शक्ती आहे.''

'' लागली शर्त ? ''

''लागली शर्त !'' शब्द औषधानां चॅलेंज करतात.

आठ दिवसानीं गृहस्थ येतात बरोबर तिला घेऊन, आठ दिवसात दोनदा त्रास झालेला, डॉक्टर जपून ठेवलेल प्रिस्क्रिपशन तिला देतो. तिला तपासत नाहीच तो, ती पाहाते, ... कागदावरचे शब्द, त्या शब्दात औषध नसल्याच कळत तिला, खोल विहीरीच्या आतून अलगद वर येणारे, मंदिराच्या गाभा-यात प्रतिध्वनी होउन घुमणारे शब्द !

''फुलांच्या वेलीला दैवी शक्ती लाभलेली असते,<br>
सुगंध देत राहण्याची<br>
फुला फुलांमधून<br>
कुणी कितीही फुल खुडुन नेलीत

तरी शक्ती जात नाही, जाणा-या सुगंधासोबत !
तुझ्यातली दरवळही थकत जाईल, शेवटच्या श्वासापर्यंत,
तेव्हा तूला दिसतील,
तुझ्या फुलांतली रुजलेली बीजं
आणि त्याच्या नंदनवनात तुझाच सुगंध असेल
चिरंजीव !

तिचा चेहरा हसरा होतो, तिला खोट खोट वाटू लागत तो आलाय, किंवा तो नाही आला तरी शब्द येताहेत. ... .... गृहस्थ जादूचा खेळ पहात असल्यासारखे, डॉक्टरला जाणवलेली असते जगातली दी ग्रेट

शब्द-शक्ती !!!



लेखकः-
डॉ. मुरलीधर भावसार
निशांत हाउसींग सोसा,3-8
धंन्वतरी नगर, कामटवाडे, नाशिक-8
09423092062